www.sgbauonline.com

**AR–330**

**B.A. (Part–III) Examination**
**(Modern Indian Language)**
**MARATHI (Compulsory)**

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 70

**सूचना** :— सर्व प्रश्न सोडवा.

1. डॉ. वि. भि. कोलते यांनी विदर्भाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा कशाप्रकारे घेतला आहे ? 12

**किंवा**

विद्यापीठ निर्मिती मागील महात्मा गांधींची भूमिका विशद करा.

2. पंढरीनाथ पाटील यांनी राष्ट्राच्या उत्पन्न वाढीसाठी कोणकोणत्या उपाययोजना सांगितल्या आहेत ? 8

**किंवा**

श्याम मानव यांनी उच्चविद्याविभूषित वर्गात असणाऱ्या अंधश्रद्धांवर कसा प्रहार केला आहे ?

3. 'अतिथी देवो भव' या कथेतून प्राणप्रिय बैलांप्रती पैकू आणि बायजाच्या भावना कशा व्यक्त झाल्या आहेत ? 12

**किंवा**

आधुनिक युगातील बदलत्या कुटुंबव्यवस्थेचे दर्शन 'घर' या कथेद्वारे घडवा.



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

4. म्हातारपणाचे कोणते फायदे लेखकाने स्पष्ट केले आहे ? 8

किंवा

कुलू खोऱ्यातील बगळयांच्या शिकारीचे हृदय वर्णन मारुती चितमपल्लींनी कसे केले आहे ?

5. 'जोगिया' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 12

किंवा

कलावंताच्या सामर्थ्याची जाण कवी सुरेश भटांनी कशी व्यक्त केली आहे ?

6. रामदासांनी उत्तम पुरुषाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ? 8

किंवा

'लोकसंख्या' या कवितेतून कवीची मानवतेची आस कशी प्रकट केली आहे ?

7. (अ) भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न झालेल्या स्त्रीमुक्ती दिनाची बातमी दैनिक लोकमतसाठी तयार करा. 5

किंवा

महिला महाविद्यालय, खामगाव येथे ग्रंथपाल पदाच्या रिक्त जागेचा जाहिरातीचा नमुना तयार करा.

(ब) खालील उताऱ्यावरील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

विज्ञानाची दुहेरी शक्ती असते. एक असते विनाश शक्ती आणि दुसरी विकास-शक्ती. विज्ञान सेवाही करू शकते आणि संहारही करू शकते. अग्निनारायणाचा



शोध लागला, तर त्याने रसोईही बनवता येते व घराला अगही लावता येते. परंतु अग्नीचा उपयोग घर फुंकण्यासाठी करायचा किंवा चूक पेटवण्या साठी करायचा याची अक्कल विज्ञानाला नाही. ही अक्कल आत्मज्ञानाला आहे.

पक्षी जसा दोन पंखांनी उडतो तसा मनुष्य आत्मज्ञान व विज्ञान या दोन शक्तींनी युक्त होऊन सुखी होतो. मोटारीत एक गती देणारे यंत्र असते. त्यापैकी एक जरी यंत्र नसले, तरी काम होणार नाही. मोटारीला दोन्ही यंत्राची जरुरी आहे. आपण पायांनी चालतो, डोळ्यांनी चालत नाही. डोळ्यांनी दिशा कळते. आत्मज्ञान आहे-डोळे आणि विज्ञान आहे पाय. मानवाला जर आत्माज्ञानाची दृष्टी नसेल तर तो आंधळा, कोण कोठे जाईल ! आणि त्याला डोळे आहेत परंतु पाय नाहीत तर तो इकडे तिकडे पाहू शकेल. परंतु घरातच त्याला बसून राहावे लागेल. म्हणून विज्ञानाशिवाय जगात कोणतेही काम होऊ शकणार नाही आणि आत्मज्ञानाशिवाय विज्ञानाला योग्य दिशाही मिळणार नाही.

(i) विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड हवी, असे लेखकाने कसे पटवून दिले ?

(ii) आत्मज्ञानाशिवाय वैज्ञानिक प्रगती झाल्यास कोणता अनर्थ घडून येईल ?

(iii) मानवी जीवन केव्हा सुखी होईल ?

(iv) विज्ञानाच्या शक्ती कोणत्या आहेत ?

(v) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

किंवा

वरील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश लिहा.



www.sgbauonline.com